**मे.फिलेक्स मिनरल्स रा. ११७ प्रशांत नगर, नागपूर यांचे तर्फे प्रस्तावित भिवडोनी क्वॉर्टज व क्वॉर्ट जाईट खनिज खदान ख.क्र. २३९ गाव भिवडोनी तह. सौंसर जि. छिंदवाडा मध्यप्रदेश करिता ९०.०६७ हेक्टर या खनन क्षेत्रात ०.०२५ दशलक्ष टन प्रती वर्ष मॅगनिजचे उत्पादन करण्याकरीता प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

********

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अंतर्गंत मे.फिलेक्स मिनरल्स रा. ११७ प्रशांत नगर, नागपूर यांचे तर्फे प्रस्तावित भिवडोनी क्वॉर्टज व क्वॉर्ट जाईट खनिज खदान ख.क्र. २३९ गाव भिवडोनी तह. सौंसर जि. छिंदवाडा मध्यप्रदेश येथील ९०.०६७ हेक्टर या खनन क्षेत्रात एकुण ०.०२५ दशलक्ष टन प्रती वर्ष मॅगनिजचे खणन करण्याकरीता प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. २८/१०/२०२२ रोजी दुपारी ११.३० वाजता जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिंदेवानी ग्राम-सिंदेवानी (बु) ता.सावनेर, जि.नागपूर महाराष्ट्र येथे श्रीमती. विजया बनकर, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री.उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने दुपारी ११.३० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत. **(सहपत्र-१)**.

## पार्श्वभूमी

मे.फिलेक्स मिनरल्स रा. ११७ प्रशांत नगर, नागपूर यांचे तर्फे प्रस्तावित भिवडोनी क्वॉर्टज व क्वॉर्ट जाईट खनिज खदान ख.क्र. २३९ गाव भिवडोनी तह. सौंसर जि. छिंदवाडा मध्यप्रदेश ९०.०६७ हेक्टर या खनन क्षेत्रात मॅगनिजचे उत्पादन करणे साठी ०.०२५ दशलक्ष टन प्रती वर्ष उत्पादनाचे पर्यावरणीय आघात मुल्यांकनाकरिता अहवाल तयार केला गेला आहे. MoEF&CC S.O. १५३३ दिनांक १४/०९/२००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ च्या नियम ५ च्या उप-नियम (३) अंतर्गत नवीन प्रकल्प किंवा उपक्रम किंवा विस्तारीकरणावर आधारित किंवा विद्यमान प्रकल्पाचे आधुनिकीकरण किंवा संभाव्य पर्यावरणीय आघातावर आधारित उपक्रम अशा उपक्रमांना काही प्रतिबंध व निर्बंध लागू केले आहे, जे अधिसूचनेच्या सारणीमध्ये नमूद केले आहे. खाणीत उत्पादित क्वॉटज व क्वॉर्टजाइट मिनरल्सचा अनेक उद्योग जसे काच, रिफेक्ट्री, फाउन्ड्री, कॉस्मेटिक, वीज, पेन्ट्स इत्यादी मध्ये उपयोग केला जाईल. प्रस्तावित ९०.०६७ हे. चा खाणपट्टा मध्यप्रदेश शासनाची भूमी आहे. या परियोजनाचा EAP अभ्यास सुरू करण्याच्या संदर्भातील TOR च्या अटींचे केंद्रस्तरीय मूल्यांकन समिती EAC नवी दिल्ली ने बैठकीत अवलोकन केले होते. MOEF&CC ने या प्रकल्पाचे अवलोकन करुन याला EIA अधिसूचनेअंतर्गत A श्रेणीत वर्गीकृत करून टर्मस ऑफ रेफरन्स (TOR) दि. ०५.०७.२०२१ ला दिला आहे.

<u>प्रयोजन व कार्यपध्दती:-</u>

**समन्वयक तथा** उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरूवात केली.

सर्वप्रथम मा.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्षा, जन सुनावणी समिती यांनी जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल, त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टीका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप द्यावयाचे असतील व या ठिकाणी तोंडी मांडावयाचे असतील तर त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल, असे सांगितले.

**समन्वयक तथा** उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या EIA अधिसूचना क्र. **1533 (E)** दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे, असे सांगितले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २६/०९/२०२२ ला दैनिक द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन वृत्तपत्रात पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सूचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२)**.

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचनेप्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ट असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहीर सुनावणीच्या तारखेपूर्वी परिसरातील लोकांकडून लिखित स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकही आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झालेले नाही. मंडळाचा आदेश क्र. ई-७४/२०२२ पत्र क्र. MPCB/JD/(WPC)/PH/B-220930FT30179 dtd. 30/09/2022 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. **(सहपत्र-३)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत ९०.०६७ हेक्टर या खनन क्षेत्रात क्वार्टज व क्वॉर्टजाईट उत्पादन करणे, ०.०२५ दशलक्ष टन प्रती वर्ष प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक बाबींबाबत] प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-१ यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सूचना, टीका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्यास आपले नांव व गावाचे नांव सांगून मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री.अंकुश डोंगरे ग्रामपंचायत, शिंदेवानी**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | आपल्या कंपनीच्या माध्यमातून १८ लोक लागणार आहेत ते मध्यप्रदेशचे राहणार आहेत की महाराष्ट्राचे राहणार आहेत? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, असे नाही की फक्त मध्यप्रदेशच्याच लोकांना घेतले जाईल. हा प्रकल्प गावाच्याजवळ असल्यामुळे आजूबाजूच्या लोकांना रोजगार मिळणार आहे. यात स्थानिक लोकांना प्राध्यान्य राहील. सध्या फक्त १८ लोकांचीच आवश्यकता आहे, प्रकल्म मोठा झाल्यावर अजून लोकांना सामावून घेण्यात येईल. यात मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र अशा दोन्ही राज्यातील लोकांना रोजगार देण्यात येईल. |
| २ | आपण ज्या आरोग्याच्या योजना राबविणार आहेत त्यासाठी समिती नेमणार आहात का, सोबतच ग्रामपंचायतीला काही अधिकारी राहील काय ? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्या आरोग्याच्या योजना आम्ही राबविणार आहोत त्यासाठी एक समिती नेमणार आहोत. |
| ३ | खदानीसाठी जे कामगार लागणार आहेत त्यांना शिक्षणाची वगैरे अट आहे का ? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणीसाठी जे कामगार लागणार आहे त्यांना त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्राध्यान्य राहील. |

**२) श्री. तुषार बुरान ग्रामपंचायत, शिंदेवानी**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | आपल्या या प्रकल्पातून या गावाचा काय फायदा होणार आहे ? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हा प्रकल्पामुळे या गावाच्याजवळ असल्यामुळे फायदाच होणार आहे. या गावातील विविध विकासकामे केली जाणार आहे. आर्थिक मदत म्हणून १० लाख रुपयांची तरतूद केली जाणार आहे. लोकांच्या आरोग्यासाठी शिबिरे घेण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ वाढविण्यात येईल. |
| २ | यात या गावातील तरुण पीढीतील बेरोजगार मुलांना जास्तीतजास्त रोजगार मिळावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, यात शैक्षणिक अर्हतेनुसार रोजगार देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ३ | आपण खाणीसाठी ज्या वेगवेगळया मशनरीज आणणार आहात त्यांचा आमच्या गावातील लोकांवर काय परिणाम होणार आहे, काय हानी होणार आहे, हानी झाल्यास त्यासाठी आपण काय नियोजन करणार आहात ? लोकांच्या आरोग्यावर जे दुष्परिणाम होणार आहे त्यासाठी काय उपाययोजना करणार आहात व गावकऱ्यांना कशाप्रकारे फायदा मिळणार आहे ते सांगा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या खाणीत स्फोटकामुळे हानी होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाईल. लोकाच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल त्यासाठी खाणीतील सर्व मजूरांना चिकित्सा सुविधा मोफत दिली जाईल ज्यामध्ये छातीलचा एक्स-रे फुफ्फूसांचे परिक्षण, श्रवणशक्ती, टीबी, मलेरिया इत्यादींचा समावेश असेल. CSR च्या गतिविधीनुसार विभिन्न शाळेतील विद्यार्थ्यांना जलदार वृक्ष व नर्सरीसाठी प्रोत्साहित करण्यात येईल. अशा प्रकारे विविध कार्यक्रम वा योजना राबवून गावाचा विकास करण्यात येईल. |

### ३) हरि मेश्राम ग्रामपंचायत, शिंदेवानी

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रोजगार कोणाला देणार आहात, ज्याला रोजगार नाही त्याला रोजगार देण्यात यावा. आमच्याजवळ काही नाही आम्हाला काम देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, यात शैक्षणिक अर्हतेनुसार रोजगार देण्यात येईल. येथील स्थानिक लोकांना यात प्राधान्य देण्यात येईल. |

समन्वयक यांनी सांगितले की :- सदर खदाणीस मप्रनि मंडळा व्दारे वेळोवळी भेट देऊन पाहणी करण्यात येईल. पाहणी दरम्यान आढळुन येणाऱ्या तत्थ्याच्या आधारे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

### ४) लक्ष्मण करवती ग्रामपंचायत, शिंदेवानी

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | शिंदेवानी गावातील लोकांना जास्तीतजास्त रोजगार देण्यात यावा. या कंपनीचा या गावाला जास्तीतजास्त लाभ मिळावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शिंदेवानी गावातील लोकांना जास्तीतजास्त रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करु. |

(५)

५) मंगेश डोंगरे ग्रामपंचायत, शिंदेवानी

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या प्रकल्पात येथील जे उच्चशिक्षित तरुण आहे त्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार घेण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या प्रकल्पात गावातील बेरोजगार मुलांना त्यांच्या शैक्षिणक अर्हतेनुसार घेण्यात येईल. प्रकल्प सध्या खूप छोटा आहे. सध्या १८ लोक लागणार आहे. तेव्हा जास्त लोकांची गरज भासणार नाही. जेव्हा प्रकल्प मोठा होईल तेव्हा अजून जास्त लोकांना समावून घेण्यात येईल. यात ८० टक्के स्थानिक लोकांना प्राधान्य राहील. काही टेक्नीकल माणसे येथे मिळाली नाही तर ती बाहेरुन घेण्यात येईल. |
| २ | या प्रकल्पामुळे जे आजूबाजूचे झाडे कापली जाणार त्यासाठी आपण काय उपाययोजना केली आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाण क्षेत्राच्या जवळपास वृक्षारोपणासाठी स्थानिक प्रजातींच्या झाडांची निवड करण्यात येईल. खाणीच्या शेवटपर्यंत वेगवेगळया जागांवर खदान, रस्ते, कार्यशाळा कार्यालयाच्या आजूबाजूला वृक्षारोपण करण्यात येईल. |
| ३ | खाणीत जे केमिकल (रसायन) वापरले जाणार आहे का, गावातील लोकांना आजार झाल्यास त्यासाठी काय उपाययोजना करणार आहात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणीत कोणत्याही प्रकारचे केमिकल (रसायन) वापरले जाणार नाही. खणीत कोणत्याही प्रक्रिया केली जाणार नाही. फक्त खाणीतून ट्रकने वाहतूक करताना धुळीचे कण उडू शकतात, त्यासाठी पाण्याची फवारणी करण्यात येईल. धुळ नियंत्रणासाठी पाणी फवारे बसविण्यात येतील. |

६) अजय कुईटे ग्रामपंचायत, टेकाडी

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | खाण ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी शेती खूप मोठ्या प्रमाणात आहे. खाणीतून उडणाऱ्या धुळीमुळे शेतीचे नुकसान झाल्यास आपण नुकसान भरपाई देणार का ? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणीतून मोठ्या प्रमाणात माती निघणार नाही त्यामुळे १०० मीटरच्यावर धूळ जाणार नाही. खाणीमध्ये रोज ब्लास्टिंग होणार नाही व ब्लास्टिंग आधुनिक यंत्राच्या सहायने केली जाणार आहे; त्यामुळे धूळ उडणार नाही. खाणीमुळे शेतीचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येईल. |

(६)

७) दिलिप कोंडकर ग्रामपंचायत, शिंदेवानी

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कामगारांना किती तास काम करावे लागणार आहे. ८ तास काम सांगून १२-१२ तास काम करुन घेतात, त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होते व त्यांचे शोषण होते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणीमध्ये कामगारांना ८ ते ९ तासाच्यावर काम करावे लागणार नाही. १२-१२ तास काम करुन घेण्यात येणार नाही. जास्त वेळ काम (ओव्हर टाईम) काम केल्यास त्याचा योग्य मोबदला देण्यात येईल. |

**श्री.उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक जणसुनावणीसमिती.**

यांनी सांगितले की, प्रकल्पधारकाने संमतीपत्रातील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. सदर विस्तारित प्रकल्प सुरू करण्याआधी जनतेच्या समस्या सोडविण्याकरिता केलेल्या मागण्या पूर्ण कराव्या व तद्नंतरच विस्तारिकरणं करावे.

**मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्षा लोकसुनावणी समिती.**

यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी जास्तीतजास्त स्थानिकांना रोजगार उपलब्ध करावा, परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी, अद्यावत प्रदूषण नियंत्रण व्यवस्था बसवावी याबाबत सूचना प्रकल्पधारकास केल्या.

उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्षा यांच्या परवानगीने ही जाहीर लोकसुनावणी संपली असे जाहीर करण्यात आले.

**(उमाशंकर भादुले)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ व**
**समन्वयक, लोक सुनावणी समिती**

**(अशोक करे)**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**
**सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(विजया बनकर)**
**अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर व**
**अध्यक्षा, लोक सुनावणी समिती**

**Minutes of public hearing of M/s. Filex Minerals Res. 117 Prashant Nagar, Nagpur. For their proposed Bhiwdoni Quartz and Quartzite Mineral Mine at No. 239 Village Bhiwdoni Teh. Saunsar Dist. Chhindwara Madhya Pradesh. Project to produce 0.025 million tonnes per annum of manganese in mining area of 90.067 hectares**

Central Government Forest and Environment Department notification dated 14.09.2006 and revised notification dt. 01.12.2009.M/s.Filex Minerals Res. 117 Prashant nagar Nagpur proposed Bhiwdoni Quartz and Quartzite Mineral Mine at No. 239 Village Bhiwdoni Teh. Saunsar Dist. Chhindwara Madhya Pradesh . Environmental public hearing of the proposed project to mine a total of 0.025 million tonnes per year of quartz and quartzite in the mining area of 90.067 hectares in Chhindwara Madhya Pradesh.

Public hearing was conducted at Zilla Parishad Higher Primary School on 28/10/2022 at 11.30 PM Sindevani Village-Sindevani (Bu) T.Savner, Dist.Nagpur Maharashtra.It was conducted under the chairmanship of Vijaya Bankar, Additional District Magistrate & Resident Deputy Collector, Nagpur. Shri. Ashok Kare, Regional Officer, Nagpur, representative of M.P.C. Board & member of public hearing committee were present and Shri. Umashankar Bhadule, Sub-Regional Officer, Nagpur-1 acted as the Convenor.With the consent of the President started the proceedings of Public Hearing on Environment at 11.30 PM. Enclosing the attendance list of people present at the hearing. (Enclosure-1).

**Background**

M/s. Filex Minerals Res. 117 Nagpur proposed Bhiwdoni Quartz and Quartzite Mineral Mine at No. 239 Village Bhiwdoni Teh. Saunsar Dist. Chindwara Madhya Pradesh and prepared environmental impact assessment report for production quantity 0.025 million tonnes per annum on 90.067 hectares area.

MoEF & CC vide notification S.O. 1533 dated 14/09/2006 under sub-rule (3) of rule 5 of the Environment (Protection) Rules, 1986 , based on a new project or undertaking or expansion or Certain prohibitions and restrictions , are imposed on such activities for modernization of existing projects or activities based on potential environmental impact, which are mentioned in the Schedule of Notifications. The quartz and quartzite minerals produced in the mine will be used in many industries like glass, refectory, foundry, cosmetic, electricity, paints etc. The mining belt is the land of Madhya Pradesh Government. The conditions of TOR in terms of commissioning were reviewed by the Central Level Appraisal Committee EAC New Delhi in the meeting. MOEF&CC reviewed the project and categorized it as category A under EIA notification vide Terms of Reference (TOR) dt. Given on 05.07.2021.

**OBJECTIVES AND METHODOLOGY:-**

Coordinator & Sub-Regional Officer, Nagpur-1 started the referendum by welcoming the members of the referendum committee and the attendees, with the permission of the chairman.

First of all Hon'ble Additional District Magistrate & Resident Deputy Collector, Nagpur and Chairperson of Public Hearing Committee explained the purpose and procedure of public hearing. Accordingly, no decision regarding permission will be taken at this place, it was explained. In this public hearing the committee will only record the objections received and send them to the government, so if the people present want to give their suggestions, criticisms, comments, statements and objections regarding this project and if they want to present it orally at this place, it will be recorded and will be sent to the government, he said. Coordinator & Sub-Regional Officer, M.P.C. Board, Nagpur-1 vide EIA Notification no. 1533 (E) dated September 14, 2006 stated that the purpose of holding public hearing is clear.

He informed that a public notice has been published regarding environmental public hearing on dated 26/09/2022 in daily The Times of India (English) and daily Navarashtra (Marathi) two newspapers. A copy of the newspaper clipping of the notification published in the daily newspaper is enclosed. (annexure-1).

As per the notification of the Ministry of Forests, Environment & CC, Government of India, a copy of the summary of the Environmental Impact Assessment Report and other informative documents (in English and Marathi) containing salient features of the project were kept for public inspection, study at various government offices and Gram Panchayat offices.Written suggestions, criticisms and objections were invited from the people of the locality from publication of public notice till before the date of public hearing.

No objection has been received at MPCB office till the day of public hearing.MPC Board issued Order no. E-74/2022 letter no. MPCB/JD/(WPC)/PH/B-220930FT30179 dtd 30/09/2022 and Public Hearing Committee was constituted. (annexure-2).

Sub-Regional Officer, M. P. C. Board, Nagpur & Coordinator asked the project holder to make a detailed presentation about the project and environmental report Accordingly, the project representative detailed in local language the production of quartz and quartzite in the 90.067 ha mining area and quantity will be 0.025 million tonnes per year.He explained regarding the environmental aspects of the proposed project ,project area, benefits of the proposed project, proposed facilities, firefighting facilities, process description, environmental information, verification of expected effects, ground factors, atmosphere & weather, air factors, air quality in the area, disaster management plan, sources of air pollution, noise factors, water factors, available water quality, water use, wastewater generation, biological factors, social and economic factors, impact on local infrastructure, environmental management plans, air emissions, wastewater management, forestry programs, care management and a ppt presentation was made on these matters.

After the presentation, Sub-Regional Officer, M. P. C. Board, Nagpur1 said to the people present, if they have any questions, suggestions, criticisms, comments, objections regarding the said project, they should raise the issues by stating their name and the name of their town, village.

**Questions, criticisms, comments, objections, suggestions raised by participants as well as replies/assurances given by the project holder during the public hearing are as follows:**

**1) Shri.Ankush Dongre Gram Panchayat, Shindevani**

| Sr. No. | Objections/Suggestions/Questions raised by participants | Responses/Feedbacks given by project holders following discussion |
|---|---|---|
| 1 | 18 people will be required through your company, will they be from Madhya Pradesh or Maharashtra? | The project proponent said it is not that only the people of Madhya Pradesh that will be taken. As this project is close to the village, the surrounding people will get employment. Priority will be given to local people. Currently only 18 people are required, more people will be accommodated as the project grows. It will provide employment to the people of both the states of Madhya Pradesh and Maharashtra. |

| | | |
|---|---|---|
| 2 | Are you going to appoint a committee for the health schemes that you are going to implement, will there be powers to the Gram Panchayat? | The project promoters said that we will appoint a committee for the health schemes that we are going to implement. |
| 3 | Do the workers who are going to be needed for the quarry have any education requirements? | The project promoters said that the workers required for the mine will be given priority based on their educational qualifications. |

**2) Shri. Tushar Buran Gram Panchayat, Shindevani**

| Sr. No. | Objections/Suggestions/Questions raised by participants | Responses/Feedbacks given by project holders following discussion |
|---|---|---|
| 1 | What will this village benefit from this project? | The promoters of the project said that this project is going to benefit because of its proximity to this village. Various development works will be done in this village. Rs 10 lakhs will be provided as financial assistance. Camps will be conducted for people's health. Manpower will be increased as per requirement. |
| 2 | In this company the unemployed children of young generation of this village should get maximum employment. | The promoters of the project said that it will provide employment according to the educational qualification. |
| 3 | What will be the effect of various different machineries that you are going to bring for the mine, on the people of our village, what will be the damage, what will you plan for it in case of damage? Tell what measures you are going to take for the adverse effects on people's health and how the villagers will benefit. | The project promoters said that utmost care will be taken to ensure that the there will be no damage by explosives. In order to take care of people's health, all the workers in the mine will be provided with free medical facilities including chest x-ray, lung examination, hearing test, TB, malaria etc. As per the activities of CSR, students of various schools will be encouraged for water plants and nurseries. In this way the village will be developed by implementing various programs or schemes. |

**3) Hari Meshram Gram Panchayat, Shindevani**

| Sr. No. | Objections/Suggestions/Questions raised by participants | Responses/Feedbacks given by project holders following discussion |
|---|---|---|
| 1 | Whomever you are going to give employment, you should give employment to the one who does not have employment. We have nothing so give us work. | The promoters of the project said that it will provide employment according to the educational qualification. Local people will be given priority in this. |

**The coordinator said that : -** The said mine will be visited and inspected from time to time by officials of MPCB. Appropriate action will be taken based on the facts found during the inspection.

**4) Laxman Karvati Gram Panchayat, Shindevani**

| Sr. No. | Objections/Suggestions/Questions raised by participants | Responses/Feedbacks given by project holders following discussion |
|---|---|---|
| 1 | The people of Shindevani village should be given maximum employment. This company should get maximum benefit to this village. | The promoters of the project said that they will try to provide maximum employment to the people of Shindevani village. |

**5) Mangesh Dongre Gram Panchayat, Shindevani**

| Sr. No. | Objections/Suggestions/Questions raised by participants | Responses/Feedbacks given by project holders following discussion |
|---|---|---|
| 1 | In this project the highly educated youth of these villages should be recruited according to their educational qualification. | The promoters of the project said that the unemployed persons of the village will be recruited in this project according to their educational qualification. The project is currently very small. Currently 18 people are required. Then more people will not be needed. When the project becomes bigger, more people will be included. In this, 80 percent local people will be given priority. If some technical people are not found here, it will be taken from outside. |
| 2 | What measures have we taken for the surrounding trees that will be cut due to this project? | The project promoters said that local species of trees will be selected for plantation near the mining area. Till the end of the mine, trees will be planted around the quarry, roads, workshop office at different places. |
| 3 | What are the chemicals that will be used in the mine, what measures will you take if the people of the village get sick. | Project promoters said that no chemical will be used in the mine. No processing will be done in the mine. Only during truck transport from the mine, dust particles can fly, for which water spraying will be done. Water sprinklers will be installed for dust control. |

**6) Ajay Kuite Gram Panchayat, Tekadi**

| Sr. No. | Objections/Suggestions/Questions raised by participants | Responses/Feedbacks given by project holders following discussion |
|---|---|---|
| 1 | Agriculture is very extensive in the area where the mine is located. Will we be paid compensation if agriculture field is damaged due to dust blown from the mine? | The project promoters said that large quantity of soil will not be excavated from the mine so there will be no dust beyond 100 meters. There will be no daily blasting in the mine and blasting will be done with the help of modern technique. So the dust will not fly. In case of damage to agriculture due to mining, compensation will be given. |

7) **Dilip Kondkar Gram Panchayat, Shindevani**

| Sr. No. | Objections/Suggestions/Questions raised by participants | Responses/Feedbacks given by project holders following discussion |
|---|---|---|
| 1 | How many hours will the workers have to work? They are made to work for 12- instaed of 8 hours.Thereby causing financial loss and exploitation | The project promoters said that workers will not have to work more than 8 to 9 hours in the mine. 12 hours work will not be accepted. Overtime will be compensated accordingly. |

**Mr. UmaShankar B Bhadule, Sub-Regional Officer & Coordinator of public hearing Committee.**

He said that the project holder is bound to strictly follow the terms and conditions of the consent letter. Before starting the said expansion project, the demands made by the people should be met, fulfilled and only then the expansion should be done.

**Hon. Additional District Magistrate & Resident Deputy Collector, Nagpur and Chairperson Public Hearing Committee.**

She revised the questions of the present citizens and the answers of the project proponents regarding the said project. Also, gave instructions to the project owner that they should provide maximum employment to the locals, plant trees on a large scale in the area, and install an updated pollution control system.

The Sub-Regional Officer & Convenor thanked everyone, with the permission of the Hon'ble Speaker, the public hearing was declared closed.

| (Umashankar Bhadule)<br>Sub-Regional Officer,<br>M. P. C. Board, Nagpur-1<br>and Coordinator, Public<br>Hearing Committee | (Ashok Kare)<br>Regional Officer,<br>M. P. C. Board, Nagpur and<br>Member, Public Hearing<br>Committee | (Vijaya Bunkar)<br>Additional District<br>Magistrate and Resident<br>Deputy Collector, Nagpur<br>and<br>Chairperson, Public<br>Hearing Committee |
|---|---|---|

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone : 24010437/24020781 /24037124/24035273
Fax : 24044532/24024068/24023516
Email : jdwater@mpcb.gov.in
Visit At : http://mpcb.gov.in

MAHARASHTRA

Kalpataru Point, 3rd & 4th floor, Sion- Matunga Scheme Road No. 8, Opp. Cine Planet Cinema, Near Sion Circle, Sion (E), Mumbai – 400022.

"Your Service is our Duty"


No. BO/JD (WPC)/PH/B- 2209301TS0179 Date: 30/09/2022

## OFFICE ORDER NO. E- 74 OF 2022

**Ref: Office Memorandum issued by MoEF & CC vide No F. No. 22-25/2020.IA.III dtd 09.06.2021.**

In compliance of Notification S. O. 1533 dt. 14/09/2006 and amended Notification S.O. 3067 (E) dt. 01/12/2009 of Ministry of Environment and Forests, Government of India, the Public Hearing Panel in respect of **Proposed** Quartz & Quartzite Mining Project, Bhivdoni Village, Tah-Sauser, Dist.Chhindwara Madhya Pradesh, Project Area 90.06 Ha, peak production capacity is 0.025 MTPA. **Proposed by M/s.** Flex Minerals, Prashat Nagar, Takli Road, Nagpur, Maharashtra, Is as below;

| | | |
|---|---|---|
| 1) | **District Magistrate, Nagpur**<br>Or his representative not below the<br>Rank of an **Additional District Magistrate** | **Chairman** |
| 2) | Representative of Maharashtra Pollution Control Board<br>**Regional Officer, M.P C. Board, Nagpur** | **Member** |
| 3) | **Sub Regional Officer, M. P. C. Board, Nagpur-I**<br>**Will work as:** | **Convener** |

The public hearing is scheduled for proposed project on **28.10.2022, Time- 11:30 A.M.** The Public hearing shall be conducted in compliance with Office Memorandum issued on 09.06.2021 by MoEF&CC which should be followed strictly during public hearing.

The Members are requested to make it convenient to attend the Public Hearing scheduled on **dtd. 28.10.2022, Time- 11.30 A.M at Zilla Parishad, Uccha Prathmik School, (Zilla Parishad Higher Prathmik School) Grampanchayat Sindewani, Vill-Sindewani (Bu.), Tal-Saoner, Dist-Nagpur, Maharashtra.** Positively.

**(Ashok Shingare, IAS)**
**Member Secretary**

**Copy submitted for Information to:**

1) The Principal Secretary, Environment Department, Govt. of Maharashtra, Mantralaya, Mumbai- 400 032.
2) The Chairman M. P. C. Board, Mumbai.

**Copy for Information to:**

District Collector, Nagpur.

**Copy for Information & necessary action to:**

1) Regional Officer, M. P. C. Board, Nagpur. He is directed to bring the OM to notice of District Magistrate.
2) Sub Regional Officer, M. P. C. Board, Nagpur-I - He is instructed to ensure that the copies are served to all concerned.
3) EIC, M. P. C. Board, Mumbai - For information & display on website. – Soft copy of Executive Summary sent to EIC section.

**Copy to project proponent:**

M/s. Flex Minerals, Prashat Nagar, Takli Road, Nagpur, Maharashtra.

THE TIMES OF INDIA, NAGPUR
MONDAY, SEPTEMBER 26, 2022

"Your Service is our Duty"

# Maharashtra Pollution Control Board

## NOTICE FOR ENVIRONMENTAL PUBLIC HEARING

According to provisions of Ministry of Environment & Forest, Govt. of India Notification dtd. 14.09.2006 and amended Notification 01.12.2009 M/S. Flex Minerals, Prashat Nagar, Takli Road, Nagpur have requested Maharashtra Pollution Control Board, to conduct public hearing for their proposed Quartz & Quartzite Mining Project, Bhivdoni Village, Tah-Sauser, Dist. Chhindwara Madhya Pradesh, project Area 90.06 Ha, peak production capacity is 0.025 MTPA. According to TOR of MOEF & CC dt. 05/07/2021 public hearing shall be conducted in Madhya Pradesh & Maharashtra. Now this public hearing is proposed in Maharashtra State.

All persons including bonafide residents, Environmental groups &local affected persons and others located at the project site can participate in the public hearing physically as well as by way of online.

Views, comments, responses of the public can be filed at the following address in writing from the date of publication of this notice till the date of public hearing

Maharashtra Pollution Control Board,
Regional Office / Sub-Regional Office-I,
5th Floor, Udyog Bhawan, Civil Lines, Nagpur. 440001
Ph. No. 0721-2565308
Email :- sronagpur1@mpcb.gov.in

Public hearing will be conducted physically at site location as well as through online mode using zoom platform and details of meeting number and Password and other details are given below. Oral and written views, responses can also be presented during the public hearing to be conducted at

| | |
|---|---|
| **Venue** | : Zilla Parishad, Uccha Prathmik School, (Zilla Parishad Higher Prathmik School) Grampanchayat Sindewani, Vill-Sindewani (Bu.), Tal-Saoner, Dist-Nagpur, Maharashtra |
| **Date of Public Hearing** | : 28/10/2022. |
| **Time of Public Hearing** | : 11.30 am. |
| **Zoom Meeting link** | : https://us06web.zoom.us/j/89352724510?pwd=RTBXTzNrWklrMm5HMW56a1VRVUtrZz09 |
| **Meeting ID** | : 893 5272 4510 |
| **Password** | : 28102022 |

Copies of the summary of EIA, executive summary both in English and Marathi and other information/documents are available at the following offices.

1)Environment Department, Govt. of Maharashtra, New Administrative Building, 15 Floor, Madam Kama Marg, Mantralaya, Mumbai -32.
2)Joint Director (Water Pollution Control), Maharashtra Pollution Control Board, Kalpataru Point, 2ndand 4th Floor, Opp. Cine Planet, Near Sion Circle, Sion (E), Mumbai-400022.
3)District Collector Office, Civil Lines, Dist-Nagpur.
4)Regional Office, M.P.C.Board, 5th Floor, Udyog Bhawan, Civil Lines, Nagpur.
5)Sub-Regional Office-I, M. P. C. Board, 5th Floor, Udyog Bhawan, Civil Lines, Nagpur.
6)ZillaParishad Office, Civil Lines, Nagpur.
7)District Industries Center, Udyog Bhavan Civil lines Nagpur.
8)Sub Divisional Office, Saoner, Tal – Saoner, Dist – Nagpur.
9)Tahsildar, Tahsil Office, Saoner, Tal – Saoner, Dist – Nagpur.
10)Gram Panchayat Sindewani (Bu.), Tal – Saoner, Dist – Nagpur.
11)Gram Panchayat Bichwa, Tal – Saoner, Dist – Nagpur.

Concerned persons will be provided access to the summary of the project during office hours at the above-mentioned places.

Sub-Regional Officer,
MPCB, Nagpur-I & Convener,
Environment Public Hearing

नागपूर, 26 सप्टेंबर 2022 | नवराष्ट्र

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
# पर्यावरण विषयक जाहीरलोक सुनावणीची सुचना

वनेव पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांची अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 अन्वये मेसर्स फ्लेक्स मिनरल, रा. 117, प्रशांत नगर, काटोल रोड, नागपुर यांचे तर्फे प्रस्तावित भिवडोनी क्वॉर्टज व क्वॉर्ट जाईट खनिज खदान गाव भिवडोनी, तहसिल सौंसर, जिल्हा छिंदवाडा मध्य प्रदेश करीता यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास पर्यावरण विषयक जाहीरलोक सुनावणी घेण्याबाबत अर्ज केला आहे. गाव भिवडोनी, तहसिल सौंसर, जिल्हा छिंदवाडा या खदानी चीमॅगनिजचे उत्पादन क्षमता 0.025 मिलीयन टन/वर्ष प्रस्तावित आहे व खदानी चे क्षेत्र 90.067 हेक्टर आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिरलोक सुनावणी आयोजीत करण्यात येत आहे. पर्यावरण विभागाच्या दि.05/07/2021 च्या TOR प्रमाणे सदर प्रकल्पा बाबत प्रर्यावरण विषयक जाहीरलोक सुनावणी महाराष्ट्रात खालील प्रमाणे आयोजित करण्यात आली आहे.

सदर खदानीच्या परिसरा मधील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी, इतरनागरीकयांना सदर प्रकल्पा संबंधी विचार, टिका, टिप्पणी, आक्षेप, तोंडी किंवा लेखी स्वरूपात जाहिर सुनावणी दरम्यान नोंदविता येतील.

सदर सुनावणी मध्ये प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने झुम अॅप द्वारे सहभाग घेता येईल.

**लोकसुनावणी चे ठिकाण, दिनांक व वेळ खालील प्रमाणे नमूद केलेली आहे.**

| | |
|---|---|
| सुनावणीचे ठिकाण | :- जिल्हा परिषद, उच्च प्राथमिक शाळा, (जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा) ग्रामपंचायत सिंदेवाणी, विले- सिंदेवाणी ग्रामपंचायत गाव-सिंदेवानी (बु.), ता. सावनेर, जि. नागपुर, महाराष्ट्र. |
| सुनावणीची तारीख | :- 28/10/2022 |
| सुनावणीचे वेळ | :- दुपारी 11.30 वाजता. |
| मिटींग आयडी | :- 893 5272 4510 पास कोड :- 28102022 |

**Zoom Meeting link**
https://us06web.zoom.us/j/89352724510?pwd=RTBXTzNrWklrMm5HMW56a1VRVUtrZz09

सदर प्रकल्पा बाबत लेखी स्वरूपात विचार, टिका, आक्षेप, टिप्पणी ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन जाहिर सुनावणीच्या तारखे पुर्वी खालील पत्त्यावर किंवा ई-मेल द्वारे पाठविण्यात याव्यात.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
प्रादेशिक कार्यालय /उप-प्रादेशिक कार्यालय -1 5वा माळा, उदयोग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपुर440001. फोन नं.: 0721-2565308 ईमेल :- sronagpur१@mpcb.gov.in

सदर प्रकल्पा विषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी मध्ये) खालील कार्यालयां मध्ये उपलब्ध आहेत. संबंधीत व्यक्ती खालील कार्यालया मध्येसदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.
1. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, 15वा मजला, मादामकामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32. 2.सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणमंडळ, कल्पतरुपाईंट, 2रा व 4था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई-400022. 3.जिल्हाधिकारीकार्यालय,सिव्हिललाईन्स, जि.नागपुर. 4. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, 5वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.5. उप प्रादेशिक कार्यालय -1, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, 5वा माळा, उदयोग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर. 6. जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन्स, नागपुर, जि.नागपुर. 7.जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर. नागपुर, जि. नागपुर. 8. उप-विभागीय अधिकारी, सावनेर, ता.सावनेर, जि. नागपुर. 9. तहसिलदार कार्यालय, तहसिल कार्यालय, सावनेर, ता.सावनेर, जि. नागपुर. 10. ग्रामपंचायत सिंदेवानी (बु), ता. सावनेर, जिल्हा - नागपुर. 11. ग्रामपंचायत बिचवा, ता.सावनेर, जिल्हा-नागपुर.

उप-प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, नागपुर तथा समन्वयक,
पर्यावरण विषयक जनसुनावणी